# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०५/२०२४ (शुक्रवार) सकाळ**


---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ०२/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे खापरखेडा हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, खापरखेडा हद्दीत वलनी कडुन एक टिप्पर वाहन अवैधरीत्या विनापरवाना रेती लोड करून मिलन चौककडे वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून चनकापुर कॉलनी येथील रेल्वेपुलाखाली थांबुन नाकाबंदी केली असता वलनीकडुन येणारा संशयित १० चक्का टिप्पर क्र. एम. एच—४३/बी जी—३५२१ चा चालक **आरोपी नामे— राहुल हरिलाल नार्मुते, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ सुरादेवी खापरखेडा** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे ०४ ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून दहा चक्का टिप्पर क्रमांक एम एच—४३/बी जे ३५२१ किंमती २०,००,०००/—रू. त्यामध्ये ०४ ब्रास रेती किंमती २०,०००/— रु. व ०१ मोबाइल किंमती १०,०००/—रू. असा एकूण २०,३०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) राहुल हरिलाल नार्मुते, रा. वार्ड क्र. ०१ सुरादेवी खापरखेडा मालक नामे—२) सुभाष भोंडे वय ३० वर्ष, रा. बिणासंगम खापरखेडा ३) इलु उर्फे हनिफ हाफीज अंसारी रा. वलनी** असे एकुण ०३ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम ३७९, १०९, ३४ भारतीय दंडविधान संहीता—१८६०, सहकलम ४८(७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम ३, ४ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. खापरखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर